सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००२४६-२०१८

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६/२०१८

निशाणी क्र. ३९ व ४० वरील एकत्रित आदेश

प्रस्ततुचा अर्ज अर्जदार याने सामनेवाला क्र.१२ यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन सामनेवाला क्र.१२ चे वारस रेकॉर्डवर घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१२ विष्णू कृष्णा बाणे हे दि.१५/११/२०२३ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस ९० दिवसात म्हणजेच दि.१५/०२/२०२४ पर्यंत रेकॉर्डवर आणणे गरजेचे होते. सदरचे वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणल्यामुळे प्रस्तुत अर्ज सामनेवाला क्र.१२ विरुध्द अबेट झाला आहे. अर्जदार हे नोकरिनिमीत्त मुंबई येथे वास्तव्यास असल्याने त्यांना आपल्या कामाच्या व्यस्ततेमुळे वकिलांना भेटून आवश्यक कागदपत्रे व माहिती देणे शक्य झालेले नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.१२ चे वारस मुदतीमध्ये रेकॉर्डवर आणणे शक्य झाले नाही. सामनेवाला क्र.१२ चे वारस रेकॉर्डवर आणण्याकरिता सामनेवाला क्र.१२ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होणे आवश्यक आहे. सदरहू सामनेवाला क्र.१२ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल न झाल्यास सामनेवाला क्र.१२ चे वारस रेकॉर्डवर आणू शकणार नाहीत. त्यामुळे अर्जदाराचे कधीही भरुन न येणारे अपरिमित नुकसान होणारे आहे. तरी सामनेवाला क्र.१२ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करुन सामनेवाला क्र.१२ चे वारस रेकॉर्डवर आणणेस परवानगी मिळणेची विनंती अर्जदाराने केली आहे.

३. सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदर अर्जातील नमुद कारणे ही खोटी आहेत. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती सामनेवाला यांनी केली आहे.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, अर्जदाराने निशाणी क्र.४२ सोबत मयत सामनेवाला क्र.१२ चा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या

मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता सामनेवाला क्र.१२ विष्णू कृष्णा बाणे हे दिनांक १५/११/२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने उशिराने दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व अर्जदार व सामनेवाला यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करुन मयत सामनेवाला क्र.१२ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

– **आदेश** –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदाराने सामनेवाला यांना रक्कम रुपये १५०/– देण्याच्या अटीवर मयत सामनेवाला क्र. १२ विरुध्द झालेला अबेटमेंटचा ओदश रद्द करणेत येतो व सामनेवाला क्र.१२ चे वारस रेकॉर्डवर आणणेस परवानगी देण्यात येते.

३. अर्जदाराने सामनेवाला क्र.१२ चे वारस अभिलेखावर घेवून तशी त्वरीत दुरुस्ती करावी.

NANDA BAPUSO GHATAGE

Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.07.12 17:58:18 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः १०/०७/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.